# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक २७ जुलै, २०२३ / श्रावण ५, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **उप मुख्यमंत्री** | |
| **(३)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(५)** | **बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

---

### राज्यातील शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून गैरव्यवहार होत असल्याबाबत

**(१) * ६८१६४ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण विभागात बदली, बढती, दाखले देणे, दाखल्यावरील दुरुस्त्या, बडतर्फ शिक्षकांना पुन्हा कामावर रुजू करणे, शाळांना मान्यता इत्यादी कामांच्या माध्यमातून गैरव्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नाशिक येथील शिक्षणाधिकारी यांना अटक झाल्यानंतर त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात बेहिशोबी मालमत्ता आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणाच्या चौकशी दरम्यान यात शिक्षण विभागातील सुमारे ४० अधिकाऱ्यांचा सहभाग असून त्यांचेकडे देखील कोट्यावधी रुपयांची बेहिशोबी मालमत्ता असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षण आयुक्त यांनी या ४० अधिकाऱ्यांची चौकशी लाचलुचपत विभागामार्फत पोलीस अधिक्षक यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी रंगेहात पकडल्यानंतरही काही अधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता करुन त्यांना पुन्हा कामावर रुजू करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) I. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शालेय शिक्षण विभागातील लाचलुचपत प्रकरणात सापडलेले "वर्ग-१" व "वर्ग-२" च्या एकूण ३२ अधिकाऱ्यांची खुली अथवा गुप्त चौकशी करणेबाबत दिनांक १४/०६/२०२२ रोजीच्या पत्रान्वये महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे विनंती केलेली आहे.

II. याव्यतिरिक्त लाचलुचपत प्रकरणातील इतर १० अधिकाऱ्यांची खुली अथवा गुप्त चौकशी करणेबाबत आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक ०७/०७/२०२३ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे विनंती केलेली आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

I. संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही शालेय शिक्षण व क्रीडा विभागामार्फत सुरू करण्यात आली आहे.

II. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शालेय शिक्षण विभागातील लाचलुचपत प्रकरणात सापडलेल्या "वर्ग-१" व "वर्ग-२" च्या अधिका-यांची खुली अथवा गुप्त चौकशी करणेबाबत दिनांक १४/०६/२०२३ रोजी दिलेल्या पत्रानुसार एकूण ३२ अधिकाऱ्यांविरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. यामधील १७ अधिकाऱ्यांची उघड चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. तर उर्वरित १५ अधिकाऱ्यांची उघड चौकशी सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

III. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दि.१४/०६/२०२२ च्या पत्रात उल्लेखित एकूण ३२ अधिकाऱ्यांपैकी एकूण २९ अधिकाऱ्यांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून असून उर्वरित ०३ अधिकाऱ्यांच्या अभियोगपूर्व मंजुरीच्या प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे तहसीलदार कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याबाबत

**(२) * ६५६८६ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे तहसीलदार कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार श्री. आलोसे वासुदेव बिसन पवार यांना शेतजमीन अकृषिक जमिनीत रुपांतरीत करण्यासाठी शासकिय फी व्यतिरिक्त १ लाख ४२ हजारांची लाच स्वीकारतांना ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडून अटक केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित तहसीलदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) I. सदर प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ (संशोधन २०१८) चे कलम ७ व ७(अ) प्रमाणे तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आलोसे यांच्याविरूध्द ठाणेनगर पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा नोंद क्र.५७/२०२३ अन्वये दिनांक ११/०४/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याच दिवशी त्यांना अटक करण्यात आली होती. तदनंतर दिनांक १५/०४/२०२३ रोजी त्यांना जामीन मंजूर झाला आहे.

II. सदर गुन्हयाचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सुरु आहे. तसेच सदर प्रकरणी आलोसे यांच्या मालमत्तेबाबत उघड चौकशी करण्याची कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

III. सदर गुन्हाच्या अनुषंगाने, आलोसे वासुदेव बिसन पवार यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) १९७९ मधील नियम ४(२) अन्वये अटक केल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दिनांक ११/०४/२०२३ पासून निलंबित करण्याबाबतचा प्रस्ताव महसूल व वन विभागामार्फत शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डोंबिवली (जि.ठाणे) येथे बनावट महारेरा नोंदणी प्रमाणपत्र जोडून अनधिकृत इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी-विक्री व्यवहारांची दस्त नोंदणी केल्याबाबत**

**(३) * ६५९२६ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत बनावट बांधकाम परवानगी घेऊन त्यासोबत महारेराचे बनावट नोंदणी प्रमाणपत्र जोडून सदनिकांची विक्री करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवलीतील महारेरा बोगस नोंदणी घोटाळ्यातील एकाही बेकायदा इमारतीमधील सदनिकांच्या खरेदी विक्री व्यवहारांची दस्त नोंदणी करू नका अशा स्पष्ट सूचना ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाकडून देण्यात आल्यानंतरही कल्याण पश्चिमे कडील सह-दुय्यम निबंधक दोन यांनी बऱ्याच इमारतीमधील घरांची दस्त नोंदणी केल्याचे दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) तपास सुरु करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सह दुय्यम निबंधक कल्याण क्र.२ यांचे विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने त्यांच्याकडून पदभार काढून घेण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी पोलीस विभागामार्फत एस.आय.टी. स्थापन करण्यात आलेली असून, गृह विभागामार्फत पुढील तपास सुरु आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील ६५ बांधकाम परवानगी पत्र बनावट असल्याचे निदर्शनास आल्याने मानपाडा पोलीस स्टेशन येथे २७ बांधकाम परवानगीबाबत दि. २७.०९.२०२२ रोजी एफआयआर क्र. ०७५० तसेच रामनगर पोलीस स्टेशन डोंबिवली येथे ३८ बांधकाम परवानगीबाबत दि. ०३.१०.२०२२ रोजी एफआयआर क्र. ३५० नुसार महापालिकेच्यावतीने विकासक व वास्तूविशारद यांचेवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणातर्फे सदर प्रकल्पांची नोंदणी रद्द करण्यात आली असून, सदर माहिती महारेराच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रकल्पांमध्ये खरेदी विक्री न होण्यासाठी संबधितांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल आक्षेपार्ह लेख लिहिणाऱ्या वेबसाईटवर बंदी घालण्याबाबत**

**(४) * ६४८६७ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.राजेंद्र शिंगणे (सिंदखेड राजा), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.सुनिल शेळके (मावळ), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दल आक्षेपार्ह लेख लिहिणाऱ्या ‘इंडिक टेल्स’ आणि ‘हिंदू पोस्ट’ या वेबसाईटवर बंदी आणून संबंधित लेखकांवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधी आणि विविध सामाजिक संघटनांनी दिनांक २९ मे, २०२३ व दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलीस आयुक्त मुंबई यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी वेबसाईटवर बंदी व लेखकांवर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात दिनांक ३१ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास नाशिकसह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विविध संघटनांनी पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिक्षकांना निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) सदर आक्षेपार्ह मजकूर संकेतस्थळावरून काढून टाकण्यात आला असून यासंदर्भात आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई येथे दिनांक ३१/०५/२०२३ रोजी कलम, ५००,५०५(२) भा.दं.वि. अन्वये गु.र.क्र. ११८/२०२३ दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पहिणे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील वसतिगृहातील मुलींना पर्यटकांसमोर नाच करायला लावल्याबाबत

**(५) * ६९५१५ श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पहिणे (ता.त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक) येथील खाजगी शिक्षण संस्थेच्या शाळेमागील टेकडीवरील हॉटेल येथे काजवा महोत्सव पाहण्यासाठी आलेल्या पर्यटकांसमोर सदरहू संस्थेच्या वसतिगृहातील मुलींना जबरदस्तीने नाच करायला सांगितले जात असल्याचे दिनांक १८ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पारंपारिक नृत्य शिकवण्याच्या नावाखाली खाजगी संस्थेच्या वतीने मुलींना पर्यटकांसमोर नाचण्यास जबरदस्ती करण्यात येणे तसेच न नाचल्यास शिक्षिका छडीने मारत असल्याची तक्रार विद्यार्थिनींच्या पालकांनी वाडीवऱ्हे पोलीस ठाण्यात केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन शासनाने संस्थाचालक व शिक्षिकेविरुद्ध गुन्हा दाखल करुन शिक्षण संस्थेची मान्यता रद्द करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदरची घटना घडल्याबाबत पिडीत मुलीच्या वडीलांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वाडीवऱ्हे पोलीस स्टेशन येथे दिनांक १८.०६.२०२३ रोजी गु.र.नं. १६२/ २०२३, बालन्याय बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ चे कलम ७५ सह, अनुसूचीत जाती जमाती (अ.प्र.) सुधारणा कायदा २०१५ कलम ३ (१) (आर) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील दोन आरोपींना दिनांक २१/०६/२०२३ रोजी सी.आर.पी.सी. १९७३ चे कमल ४१ (अ) प्रमाणे सुचना पत्र दिले आहे. सदर प्रकरणी फिर्यादी व साक्षीदार तपासले असून गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कुर्ला, नेहरु नगर येथील पी १४१ ब या भूखंडावरील पुनर्विकास प्रकल्पात झालेला गैरव्यवहार

**(६) * ६५०५८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला पूर्वेकडील भूखंड क्र.पी-१३८ वर नेहरु नगर जीवनसाफल्य सहकारी गृहनिर्माण संस्थेजवळील “पी-१४१-ब” या म्हाडाच्या भूखंडावर महेश्वर नगर हा “राघव नोवा” नावाने उभारण्यात येत असलेल्या झोपडपट्टी

पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) प्रकल्पात सदर टॉवर हा मुळ सीटी सर्व्हे क्र.२ मधील म्हाडाच्या ५५१ चौ.मी.वर वसलेला असताना मात्र टॉवर उभा करण्यासाठी सर्व्हे क्र. ६४० ची सुमारे ५१८ चौ.मी. जागा जिल्हाधिकारी यांची परवानगी न घेता, त्यावर २८ झोपडी धारकांच्या पुनर्वसनासाठी सुमारे ११५ गाळ्यांचा १७ मजल्यांचा टॉवर उभा करण्यास झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने (एसआरए) दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास मान्यता दिल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुनर्विकास प्रकल्पातील बेकायदा व नियमबाह्य बांधकामांची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त प्रकल्पाची मान्यता त्वरीत रद्द करुन संबंधित अधिकारी व विकासक यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

महेश्वर नगर येथील झोपडपट्टी ही न.भू.क्र.२(भाग)पैकी ४४६.०२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या म्हाडाच्या जागेवर तसेच न.भू.क्र.६४० वरील ६२२.९० चौ.मी. क्षेत्रफळाच्या महाराष्ट्र शासनाच्या जागेवर वसलेली आहे.

सदरहू झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची जागा ही म्हाडा व राज्य शासनाच्या मालकीची असल्यामुळे न.भू.क्र.२(भाग) साठी मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांना व न.भू.क्र.६४० साठी मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना दि.२९.०३.२०१० अन्वये या झो.पु. योजनेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील अपेंडिक्स ४ विनियम क्र.२.८ मधील मानीव मान्यतेच्या तरतुदीनुसार नियोजित महेश्वर नगर सह.गृह.संस्थेसाठी म्हाडा व शासकीय जमिनीवर एकत्रितरित्या झो.पु. योजना प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई-बंगलोर महामार्गावरील नवले पूल परिसरात होणाऱ्या अपघातांबाबत

**(७) * ६७४६८ श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातून जाणाऱ्या मुंबई-बंगलोर महामार्गावरील नवले पूल परिसर वाहतूकीसाठी अत्यंत धोकादायक झाला असून तेथे मोठ्या प्रमाणात अपघाताचे प्रमाण वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसरात सतत होणाऱ्या अपघातांमुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन होणारे अपघात रोखण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबई बंगलोर महामार्गावरील नवले पूल परिसरामध्ये केलेल्या उपाययोजनांमुळे अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे.

(२) हे खरे नसून मुंबई बंगलोर महामार्गावरील नवले पूल परिसरामध्ये मागील ३ वर्षामध्ये झालेल्या अपघातांची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | सन | प्राणांतिक अपघात | गंभीर अपघात | किरकोळ अपघात |
|---|---|---|---|---|
| १ | २०२१ | ०८ | ०५ | ०५ |
| २ | २०२२ | ०२ | ०१ | ०४ |
| ३ | २०२३ | ०३ | ०१ | ०५ |

(३) सदर ठिकाणी होणारे अपघात रोखण्याकरिता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांनी चौकशी समिती गठीत केली होती. या समितीद्वारे प्राप्त अहवालाच्या आधारे खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत :-

- मुंबई बंगलोर हायवेवर नवले पूल येथील अपघातास प्रतिबंध करण्याकरीता आवश्यक त्या ठिकाणी साईन बोर्ड/ डिजीटल बोर्ड लावण्यात आले आहेत.
- सदर रोडवरील अतिक्रमण काढण्यात आले असून रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.
- रोडवर रुंद व जाड्या रम्बलर पट्ट्या, लेन मार्किंग, एन्ट्री / एक्झिट पॉईंट तयार केले आहेत.
- सदर रोडवरील नऱ्हे सेल्फी पॉईंट या ठिकाणी स्पीड लिमीट कॅमेरा बसविण्यात आला असून त्याद्वारे २४ तास ओव्हर स्पीडच्या केसेस केल्या जातात.
- नवीन कात्रज बोगदा येथे वाहतूक तपासणी नाका चौकी उभारण्यात आली असून तेथे अंमलदार नेमण्यात आलेले आहेत.
- सातारा लेन व मुंबई लेन करीता १ पेट्रोलिंग व्हॅन नेमण्यात आली असून १ अधिकारी व २ अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे.
- नवीन कात्रज बोगदा ते नवले पुल दरम्यान वेगमर्यादा ताशी ६० कि.मी. असून ती ४० कि.मी. करण्यात आली असून प्रेसनोट प्रसिध्द करून तसेच ४० कि.मी.वेगमर्यादेचे बोर्ड लावून आदेशाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.
- सदर रोडवर नवले पूल व कटील हॉटेल येथे नवीन हाय मस्ट लॅम्प बसविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पोलिस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(८) * ६७०३८ श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिस शिपाई पदासाठी सन २०२१ मध्ये झालेल्या भरतीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विमुक्त जाती प्रवर्गामध्ये ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले आहेत, त्यातील बहुतेक उमेदवार या प्रवर्गातीलच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनेकांनी "राजपूत भामटा" जातीचे दाखले अवैध मार्गाने मिळवून शासनाची फसवणूक केल्यामुळे खरे लाभार्थी नोकरीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी एका उमेदवारासह मदत करणाऱ्या अन्य दोघांना सिंधुदुर्ग पोलीसांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पोलीस शिपाई भरती सन २०२१ अंतर्गत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाच्या भरती प्रक्रियेचा अंतिम निकाल अद्याप जाहिर करण्यात आलेला नसल्याने पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी अद्याप झालेली नाही. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई वगळता इतर सर्व घटकांमध्ये "विमुक्त जाती (अ)" या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांनी सादर केलेली जात प्रमाणपत्र पडताळणीकरीता संबंधित विभागीय आयुक्त यांचेकडे पाठविण्यात आली असून सदरहू पडताळणीनंतर त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) व (५) राजपूत भामटा या जातीचे दाखले अवैध रितीने मिळविल्याचे कोणतेही प्रकरण उघडकीस आलेले नसून पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांच्यामार्फत राबविण्यात आलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत समांतर आरक्षणानुसार निवड झालेल्या उमेदवारांनी बनावट प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त दाखला सादर केल्याचे निष्पन्न झाल्यावरुन सिंधुदुर्गनगरी पोलीस ठाणे येथे दि.३०.०५.२०२३ रोजी २ गुन्हे दाखल झाले असून ४ आरोपींना अटक करण्यात आली. पुढील पोलीस तपास सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर शहरातील प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गतच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(९) * ६७१२७ श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील पडेगाव, सुंदरवाडी, तीसगाव, चिखलठाणा आणि हर्सुल याठिकाणी १२७ हेक्टर वर ४० हजार सदनिका बांधण्यासाठी राबविण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेत सुमारे १ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजनेअंतर्गत रु.४०६० कोटी रुपयांच्या सदनिका बांधण्याचे काम मे.समर्थ कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अंतर्गत ०६ नगर परिषदा, नगरपंचायतच्या पंतप्रधान घरकुल योजनेच्या निविदा रिंग करण्याच्या हेतूने एकाच आय.पी. ॲड्रेस वरून भरण्यात आल्याच्या तक्रारीवरून ई.डीने (अंमलबजावणी संचालनालय) ९ विविध ठिकाणी धाडी टाकल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आह काय,

(४) असल्यास, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शासनाने दोन समित्या नेमल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त घरकुल योजने मध्ये झालेल्या गैरव्यवहारा संदर्भात तीन कंपन्यांच्या १९ संचालकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे : (**१) छत्रपती संभाजी नगर, महानगर पालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत मंजूर प्रकल्पासाठी राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रिये-संदर्भातील तक्रार प्राप्त झाली आहे हे खरे आहे.

(२) महानगरपालिकेने निविदा प्रक्रियेंअंती समरथ कन्स्ट्रक्शन जाँईंट व्हेंचर यांना LOI दिलेला होता. मात्र, सदर निविदा प्रक्रिया रद्द करुन नव्याने निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(३) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका तसेच इतर नगरपालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजनेच्या निविदा एकाच आयपी ॲड्रेस वरुन निविदा दाखल केल्याचे आढळून आले. प्रस्तुत निविदा प्रक्रिया प्रकरणी आर्थिक संचालनालयामार्फत (ईडी) छत्रपती संभाजी नगर, महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त, उपायुक्त महानगरपालिका व अन्य संबंधीत अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांची साक्ष नोंदविण्यात आली.

(४) दिनांक ०५.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. तसेच, दिनांक ०९.१२.२०२३ च्या आदेशान्वये आर्थिक व्यवहार्यता तपासणी उपसमिती तसेच स्थळ पाहणी व घरकुले निश्चितीकरण उपसमिती अश्या दोन उप समित्या गठीत करण्यात आल्या होत्या.

(५) होय.

(६) दिनांक ०५.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण) यांचे अध्यक्षतेखाली प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत औरंगाबाद येथील प्रकल्पांसाठी चौकशी समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार कार्यवाही करणेबाबत आवश्यक त्या सूचना शासनस्तरावरून निर्गमित करण्यात आल्या आहेत.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खडवली (जि.ठाणे) येथील काळू नदीच्या पात्रातून होत असलेला बेकायदा पाणी उपसा**

**(१०) * ६६७३७ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टिटवाळा-खडवली (जि.ठाणे) दरम्यान असलेल्या काळू नदीच्या पात्रातून टँकर माफियांद्वारे दररोज लाखो लिटर पाणी मोटरपंपाद्वारे बेकायदेशीररित्या उपसा करुन स्थानिकांना पाणीपुरवठा न करता परस्पर त्याची बाहेर विक्री करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी टिटवाळा तसेच संघवी पॅराडाईज, आसनगांवस्थित करदाते नागरिकांनी कल्याण व शहापूर पंचायत समित्या तसेच आसनगांव जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांकडे व शासनस्तरावर वारंवार तक्रार करुनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नद्यांतून बेकायदेशीरित्या पाणी उपसा करणाऱ्या टँकरमाफिया विरोधात कायमस्वरुपी कारवाई करुन स्थानिक नागरिकांना पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.
टिटवाळा व खडवली दरम्यानच्या पुलाच्या खाली टिटवाळा को.प.बंधाऱ्यानजीक काही वेळा अनधिकृत पाणी उपसा होत असल्याचे क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे.
(२) नाही. हे खरे नाही.
(३) टिटवाळा व खडवली दरम्यानच्या पुलाच्या खाली टिटवाळा को.प. बंधाऱ्यानजीक काही वेळा अनाधिकृत पाणी उपसा सुरु असल्याचे क्षेत्रिय कार्यालयाच्या निदर्शनास आले आहे. सदर बाब निदर्शनास येताच काही टँकर वाहतुकदारांकडून दंडात्मक वसुली केली आहे व टँकरद्वारे अनाधिकृत पाणी उपसा करणाऱ्यांवर आवश्यक कारवाई करण्याबाबत पोलीस निरीक्षक, टिटवाळा यांना कळविण्यात आले आहे. तसेच टिटवाळा बंधाऱ्याच्या दोन्ही बाजुस अडथळे बसवुन वाहतुकीस प्रतिबंध केला आहे. सद्यस्थितीत या बंधाऱ्यातून अनाधिकृत पाणी उपसा पुर्णपणे बंद आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील पोलिसांच्या कामाच्या तासांचे नियमन करण्याबाबत**

**(११) * ६४७८२ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुनिल केदार (सावनेर),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सुरक्षेसह शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी पार पाडत असलेल्या मुंबई पोलिसांवर कामाचा अधिक ताण असून त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचे तासच निश्चित नसल्याने पोलीस दलात पोलीसांच्या विविध आजारांसह हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांवर होणारा कामाचा अधिक ताण विचारात घेऊन दिनांक १ जानेवारी, २०१७ पासून शासनाने पोलिसांना आठ तास कामाचे (ड्युटी) नियमन करण्याचा निर्णय घेतला परंतु अद्यापही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन पोलीसांची आरोग्य योजना, रिक्त पदांवरील पोलीस भरती तसेच आठ तास कामाचे करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही. पोलीसांचा मृत्यु कामकाजाच्या अतिताणामुळे झालेला नाही.

(२) व (३) पोलीसांवरील कामाचा ताण कमी करण्याच्या दृष्टीकोनातून पोलीसांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असून सद्य:स्थितीत राज्यातील पोलीस शिपाई, पोलीस शिपाई चालक व राज्य राखिव पोलीस शिपाई यांची एकूण १८३३१ पदे भरण्याबाबतची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच पोलीसांच्या आरोग्यासाठी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथून पनवेलकडे जाणाऱ्या लोकलमध्ये एका तरूणीवर झालेला अत्याचार

**(१२) * ६९८२७ श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकातून पनवेलकडे जाणाऱ्या धावत्या लोकल रेल्वेमध्ये मस्जिद बंदर स्थानकादरम्यान एका २० वर्षीय तरुणीवर विनयभंग व बलात्कार झाल्याचे दिनांक १५ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकलच्या महिला डब्यात पोलीस तैनात असणे आवश्यक असतांना सदर रेल्वेमधील महिला डब्यात पोलीस नसल्याने ही घटना घडली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन तरुणीवर बलात्कार करणाऱ्यावर व गाडीत पोलीस तैनात नसल्यासंदर्भात जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदरील घटना ही दिनांक १४ जून,२०२३ रोजी सीएसएमटी वरून पनवेलला जाणाऱ्या ०७ वाजून २६ मिनीटांच्या स्लो लोकल मध्ये घडली. सदर प्रकरणी सीएसएमटी रेल्वे पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ५३१/२०२३, कलम ३७६ (१), ३५४, ५०९, ३२३, ५०४, भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर घटनेच्या वेळी ट्रेनमधील महिला डब्यात पोलीस नसल्याची बाब खरी आहे.

महिलांच्या सुरक्षिततेसाठी लोकल ट्रेनमधील महिला डब्यात रात्री ९ ते सकाळी ६ वाजेपर्यंत लोकल पेट्रोलींग कार्यरत आहे. इतर वेळी फलाटावर गस्तकामी पोलीस तैनात केले जातात.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपीस घटनेच्या दिवशीच दिनांक १४ जून, २०२३ रोजी अटक करण्यात आली असून आरोपीची फिर्यादीकडून ओळख परेड होऊन दोषारोपपत्र दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरील घटना ही सकाळी ७.३० ते ८.३० दरम्यान घडली असल्याने पोलीस तैनात नसल्यासंदर्भात कोणाविरुद्धही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भामरागड (जि.गडचिरोली) येथे एकात्मिक आदिवासी प्रकल्प अंतर्गत देण्यात येणाऱ्या केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(१३) * ६७०६५ श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) या अतीदुर्गम भागातील आदिवासी बांधवांना आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय योजनेअंतर्गत व्यवसायासाठी दुभत्या, दुधाळ गायी घेण्याकरिता थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) माध्यमातून देण्यात आलेल्या अनुदानात गैरव्यवहार झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुधाळ व संकरित गायी घेण्याकरिता २० आदिवासी लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून प्रत्येकी एक लाख असे एकूण २० लाख रुपये खात्यात जमा करण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांनी 'शहानवाज'नावाच्या व्यक्तीसोबत लाभार्थ्यांना बँकेत नेऊन त्यांच्या खात्यातील रक्कम काढून मरणासन्न अवस्थेत असलेल्या गायींसोबत फोटो देखील काढण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्प अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत कारवाई करणे अपेक्षित असतांना असा कोणताही प्रकार घडलेला नसल्याचे सांगून दोषींना पाठीशी घातले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याबाबत व दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२) (३) व (४) सन २०२२-२३ मध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेंतर्गत थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून एकूण २० आदिवासी लाभार्थ्यांना दुधाळ गायी पुरविणे योजनेंतर्गत रू.१ लाख प्रति लाभार्थी इतके अनुदान देण्याची योजना भामरागड प्रकल्पांतर्गत राबविण्यात आली आहे. सदर प्रकरणी सखोल तपासणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात एकाच व्यक्तीच्या नावे २१ हजार बोगस सिमकार्ड सापडल्याबाबत**

**(१४) * ६४७२३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.रवींद्र**

**धंगेकर (कसबापेठ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), ॲड.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात एकाच व्यक्तीच्या फोटोच्या आधारे शेकडो बोगस सिम कार्ड घेतल्याची बाब माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात २१ हजार बोगस सिमकार्ड असल्याची माहिती टेलिकॉम विभागाच्या कार्यवाहीतून निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा बोगस पध्दतीने घेतलेल्या सिम कार्डचा वापर गुन्हेगारांकडून करण्यात येत असल्याने या गंभीर बाबीबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.

बनावट फोटो व कागदपत्रांचा वापर करून खरेदी केलेले राज्यातील २१,०३१ सिमकार्ड दूरसंचार विभागाने खंडित केल्याबाबत डेक्कन हेराल्ड या वर्तमानापत्रामध्ये दिनांक ०९.०५.२०२३ रोजी प्रसिद्ध झालेल्या बातमीद्वारे निदर्शनास आले आहे.

तथापि, बनावट फोटो व कागदपत्रांच्या आधारे बोगस सिम कार्ड घेतल्याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने राज्यातील ९ पोलीस घटकांमध्ये १८ गुन्हे दाखल असून, यामध्ये साधारणतः १६६४ बोगस सिमकार्ड वितरीत केले असल्याची बाब तपासामध्ये निष्पन्न झाली आहे.

(३) बोगस सिमकार्ड वापराच्या अनुषंगाने राज्यातील विविध पोलीस घटकांमध्ये एकूण १८ गुन्हे दाखल करण्यात आले असून प्रकरणी निष्पन्न ४६ आरोपींपैकी २५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सायबर गुन्ह्यांमध्ये सामील असलेले सिमकार्ड ब्लॉक करण्याकरिता केंद्रीय गृह मंत्रालयाच्या भारतीय सायबर क्राईम समन्वय केंद्राने ऑनलाईन पोर्टल सुरू केले आहे. त्याअनुषंगाने, पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दिनांक ०७.०७.२०२३ रोजीच्या परिपत्रकान्वये, सदर पोर्टल वर सायबर गुन्ह्यामध्ये वापरण्यात आलेल्या सिमकार्डची माहिती दाखल करण्याबाबत सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेला गैरव्यवहार

**(१५) * ६६८९५ श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री.मनोज फुलबोयणे यांच्यासह ४ जणांनी दिनांक २६ मे, २०१५ ते दिनांक ८ जून, २०२२ या कालावधीत २६ कोटी रूपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसिलदार (सर्वसाधारण) हे आहरण व संवितरण अधिकारी असून त्यांनी सदर कालावधीत कार्यालयीन खात्यामधील रक्कमेची पडताळणी अथवा ताळमेळ करणे आवश्यक असतानाही तसे केले नसल्यामुळे सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, लातूर यांनी त्यांच्या स्तरावर लेखाधिकारी यांचे पथक नेमून कार्यालयीन खात्याचे लेखापरिक्षण केले असून लेखापरिक्षणांतर्गत निर्दशनास आलेल्या बाबींवरून एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गुन्हाच्या अनुषंगाने दोन आरोपींना अटक करण्यात आली असून शासकीय कामकाज करताना सतर्कता न बाळगणे व प्रभावी नियंत्रण न ठेवल्याबाबत संबंधित तहसीलदार (सर्वसाधारण) तथा आहरण व संवितरण अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर गैरव्यवहार तीन जिल्हाधिकाऱ्यांच्या कालावधीत झालेला असून यामध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी यांच्या कालावधीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आ ल्यानंतर त्यांनी श्री.मनोज फुलबोयणे यास लेखा शाखेचे काम देण्यात येवू नये व याची नोंद त्याच्या सेवा पुस्तिकेत घेण्याचे आदेश दिले असतानाही श्री.फुलबोयणे यांचेकडील लेखाशाखेचा पदभार काढण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने या प्रकरणातील सर्व दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसिलदार (सर्वसाधारण) यांच्या बँक खात्यातून रू.२५,९१,७२,७७७/- (अक्षरी रूपये पंचवीस कोटी एक्क्यान्नव लाख बाहत्तर हजार सातशे सत्त्याहत्तर) इतक्या शासकीय रक्कमेचा अपहार लेखा शाखेतील तत्कालीन रोखपाल तथा अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर याच्यासह इतर ३ खाजगी व्यक्तींनी केला आहे, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील लेखा शाखेतील शासकीय रक्कमेच्या अपहाराच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. लातूर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

(४) संबंधित अव्वल कारकून यांची जिल्हाधिकारी लातूर कार्यालयाच्या दि.०८.०६.२०२२ रोजीच्या आदेशानुसार, तहसिल कार्यालय औसा येथे बदली करण्यात आली आहे.

(५) लेखापरिक्षणांतर्गत शासकीय रक्कमेच्या अपहाराच्या अनुषंगाने संबंधित अव्वल कारकून, जिल्हाधिकारी कार्यालय लातूर याच्यासह इतर ३ खाजगी व्यक्तींविरूध्द पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी. लातूर येथे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांच्याविरूध्द आर्थिक गुन्हे अन्वेषण पोलीस अधिक्षक कार्यालय लातूर यांचे विशेष पथकामार्फत पोलीस तपास सुरू असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. संबंधित अव्वल कारकून यांचेविरूध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असून, सदरचे प्रकरण मा.न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे.

प्रकरणातील अपचारी संबंधित अव्वल कारकून तसेच उक्त कालावधीतील सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेविरूध्द म.ना.से. (शि. व अ.) नियम १९७९ चे नियम ८ व १२ अन्वये संयुक्त विभागीय चौकशी सुरू करण्याकरिता, सदरचा प्रस्ताव जिल्हाधिकारी लातूर कार्यालयामार्फत शासनाकडे प्राप्त झाला असून, त्यावर कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोरेगांव येथील चित्रनगरीच्या हद्दीतील नागरमोडी आदिवासी पाडयात अनधिकृत बांधकामे केल्याबाबत

**(१६) * ६५३६९ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोरेगांव (पूर्व) येथील चित्रनगरीच्या हददीत येणाऱ्या नागरमोडी आदिवासी पाडयात भाडेकरु तत्वावर राहणाऱ्या लोकांनी मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे करुन अनेक जागा बळकाविल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चित्रनगरीमधील मुख्य सुरक्षा अधिकारी, यांनी स्थानिक लोकप्रतिनिधिकडे दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन सदर बाब निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदिवासी पाडयातील अनधिकृत बांधण्यात आलेल्या झोपडपट्ट्यांमध्ये मोठया प्रमाणात चरस, गांजा, यासारख्या अंमलीपदार्थांचा वापर तसेच गुंडगिरी, मारामारी, महिलांची छेडछाड आदि प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिंधीनी दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास महाव्यवस्थापक, फिल्मसिटी, गोरेगांव (पूर्व) यांच्याकडे पत्रव्यवहार केला तसेच दिंडोशी पोलिस स्टेशन मध्ये २२३/२०२३ अन्वये तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त तक्रारीच्या व निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दादासाहेब फाळके चित्रनगरीमधील नागरमोडी पाडा व धोंडाबाईहबाळे पाडा येथील रहिवाशांनी सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे सर्वेक्षणासाठी गेले असता तेथील रहिवाशांनी बायोमॅट्रीक सर्वेक्षणास विरोध असल्याचे वातावरण केल्याने सर्वेक्षण करता आले नाही त्यामुळे नागरमोडी आदिवासी पाडयात राहणाऱ्या लोकांची माहिती उपलब्ध नाही.
(३) व (४) होय हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींनी त्यांच्या निवेदनात तेथील रहिवाशांकडून अशा तक्रारी आल्याचे कळविले आहे. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने गोरेगाव चित्रनगरीकडून दिंडोशी पोलीस स्टेशन मध्ये तक्रार देण्यात आली होती. परंतु सदरची बाब आरे पोलीस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आरे पोलीस स्टेशन यांच्याकडे दि.२४.०४.२०२३ रोजी तक्रार केली आहे.
(५) संबंधित विभाग / प्राधिकरणांसमवेत बैठक घेऊन उचित कारवाई करण्यात येणार आहे.

-----------------

## लोहगाव (जि.पुणे) येथील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र पोलीस मेगा सिटी सहकारी गृहनिर्माण संस्था उभारण्याबाबत

**(१७) * ६६७८९ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहगाव (जि.पुणे) येथील पोलिसांना घरे उपलब्ध होण्यासाठी निर्माण केलेल्या महाराष्ट्र पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम अद्यापही पुर्ण न झाल्यामुळे जवळजवळ ७ हजार पोलीस घरापासून वंचित असून पोलीसांचे ५२५ कोटी रुपये त्यात अडकले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचालक मंडळाने ५२५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी संबंधितांनी महारेरा, सहकार व आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेमार्फत चौकशी करण्याची मागणी मेगासिटी बचाव समितीच्या वतीने करण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, वयाळ (जि.रायगड) गावात बृहन्मुंबई पोलिस सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सुमारे ८४०० पोलिसांची घरे असणारा मेगाटाऊन प्रकल्प गेली अनेक वर्षे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीसांना तातडीने घरे देण्याबाबत तसेच यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) होय.

महाराष्ट्र राज्यातील आजी व माजी वरीष्ठ ते कनिष्ठ दर्जाच्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी लोहगाव, पुणे येथे पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्था २००९ साली स्थापन केली. पोलीस मेगासिटी सहकारी गृहनिर्माण संस्थेचे शासकीय विशेष लेखापरीक्षण करुन घेण्यासाठी विभागीय सहनिबंधक, पुणे सहकारी संस्था पुणे यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला असून, त्यांचा अहवालानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच याबाबत बांधकाम बिल्डर व संस्थेचे पदाधिकारी यांचेतील आर्थिक व्यवहार तपासण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे यांनी फॉरेन्सीक ऑडीटर नेमण्यासाठी दोन वेळा निविदा काढल्या असून, दुसऱ्या निवीदेनुसार एक फॉरेन्सीक ऑडीटरने निविदा भरली होती. तथापि, त्यांचेवर जळगाव येथे गुन्हा नोंद असल्याने त्यांची निविदा स्विकृत करण्यात आली नाही. पुनश्च निवीदा काढून फॉरेन्सीक ऑडीटर नेमण्याची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यातील खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१८) * ६५२४५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल-उरण (जि.रायगड) तालुक्यातील खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्तीची कामे निकृष्ट दर्जाची केल्यामुळे समुद्रातील खारे पाणी भात शेतीत गेल्याने शेतकऱ्यांची जमिन नापिक होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील बांधबंदिस्तीची कामे खारलॅन्ड व मेरी टाईम बोर्डाच्या माध्यमातून उत्तम दर्जाची केली जात नसल्यामुळे अल्पावधीतच खाडी किनाऱ्यावरील बांधबंदिस्ती उद्ध्वस्त होवून शेतकऱ्यांच्या भात शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून बांधबंदिस्तीची कामे उत्तम दर्जाची करण्यासाठी तसेच निकृष्ट दर्जाच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे.

खोपटा कोप्रोली खारभूमी योजनेच्या शेवटच्या भागात मिठागर (केंद्रिय नमक निरीक्षक) खात्याशी संबंधित मिठागराचा बंधारा असून सदर बंधारा नादुरुस्त झाल्याने या योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रात पाणी घुसत असल्याने या भागातील खोपटा व कोप्रोली (चिखलीखार) या पुन:प्रापित क्षेत्रात खारेपाणी शिरुन भातशेतीचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नाही.

खारभूमी योजनांच्या बांधांचे काम शासन निर्णय क्रमांक निर्णय २०१३/(९१/२०१३)/खारभूमी, दिनांक १२/०३/२०१३ व निविदेतील तरतूदीनुसार करण्यात येतात.

रायगड जिल्हयातील अतिवृष्टी व येणारी उधाणे यामुळे बांधाचे होणारे नुकसान याबाबतची कामे खारभूमी मंडळाकडून शेतीचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने खांडीचे बांधकाम २४०२-०३८२ परिरक्षण व दुरुस्ती तसेच २४०२-०५०४ विस्तार व सुधारणा या लेखाशिर्षांतर्गत कार्यालयाला प्राप्त होणाऱ्या निधीमधून उपलब्ध अनुदानातून करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पोलीस भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या उमेदवारांच्या वैद्यकिय प्रमाणपत्रासाठी लाच घेतल्याबाबत

**(१९) * ६७७६८ श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलीस भरती प्रकियेत पात्र झालेल्या उमेदवारांना वैद्यकिय प्रमाणपत्रासाठी लाच घेतल्या प्रकरणी अलिबाग (जि.रायगड) पोलिसांनी अलिबाग सिव्हील हॉस्पीटलमधील कर्मचाऱ्यास दिनांक १० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच गडचिरोली जिल्हयात सुरु असलेल्या पोलिस भरतीमध्ये बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर केल्याप्रकरणी गडचिरोली पोलिसांनी संबंधितास अलिबाग येथून माहे एप्रिल, २०२३ मध्ये अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) रायगड जिल्हा पोलीस भरती सन २०२१ प्रक्रियेमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांकडून वैद्यकीय प्रमाणपत्रासाठी लाच घेतल्याप्रकरणी सिव्हिल हॉस्पिटल, अलिबाग येथील लिपीक व जिल्हा शल्य चिकित्सक यांच्यावर दि.१५.५.२०२३ रोजी अलिबाग पोलीस ठाणे येथे कॉ.गु.रं.नं. १३९/००२३, भा.द.वि.क.३८४ सह लाचलुचपत प्रतिबंधक कायदा सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) गडचिरोली जिल्हा पोलीस भरती दरम्यान बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करून शासन सेवेतील प्रवेशाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारीच्या संदर्भात केलेल्या तपासानुसार निष्पन्न झालेल्या एकुण १८ आरोपींपैकी सन २०१६ मध्ये बनावट प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या आधारे रायगड पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई पदावर रुजू झालेल्या श्री.सिध्देश्वर नरेंद्र पाटील यांना दि.२९.४.२०२३ रोजी अटक करण्यात आली असून त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन, गडचिरोली येथे भा.द.वि. कलम ४१९,४२०,४६७,४६८,४७१, ३४ अन्वये अप क्र.२९१/२०२३ दाखल करण्यात आला आहे व त्यांना दि.२९.४.२०२३ रोजी सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

(३) उपरोक्त नमूद दोन्ही प्रकरणांमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सदर गुन्हे तपासाखाली आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिल्लोड, फुलंब्री (जि.छत्रपती संभाजी नगर) तालुक्यातील रस्त्यांची बनावट देयके तयार करुन केलेला गैरव्यवहार

**(२०) * ६५७३१ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड, फुलंब्री (जि.छत्रपती संभाजी नगर) तालुक्यातील ७३ रस्त्यांची कोणतीही कामे न करता बनावट देयके तयार करुन शासकिय कोषागारातून १० कोटी ७ लाख रुपयांची रक्कम घेतली असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने सहायक अभियंत्यांच्या विरोधात सिटी चौक पोलीस ठाण्यात फसवणूकीचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिल्लोड उपविभागाचे शाखा अभियंता के.एस.गाडेकर, उपविभागीय अभियंता एम.एम.कोल्हे, शाखा अभियंता बी.बी.जायभाये, आर.जी.दिवेकर, ए.एफ.राजपूत (सेवानिवृत्त) आणि नागदिवे यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी नायब तहसीलदार, रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी उपविभागीय सार्वजनिक बांधकाम सिल्लोड येथील रोहयो कुशल कामे अंतर्गत ३१ कामांमध्ये रुपये ४,५६,५४,०००/- आणि उपविभागीय सार्वजनिक बांधकाम फुलंब्री येथील रोहयो कुशल कामे अंतर्गत ४२ रस्त्यांच्या कामांमध्ये रुपये ५,५०,४६,०००/- असे एकुण ७३ कामांमध्ये रुपये १०,०७,००,०००/- इतका अपहार झाल्याबाबत दिलेल्या फिर्यादीनुसार पोलीस ठाणे सिटी चौक, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १३/०४/२०२३ रोजी गु.र.नं. १२०/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४६८, ४७१, १२० (B), ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपींना मा.न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सांताक्रुझ येथील जागृती झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(२१)** * **६७३१६ श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ वाकोला उड्डाणपूल येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या जागृती सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, सदर सदनिकांमधील प्लास्टर पडत असल्याबाबत सदनिकाधारकांनी दिनांक ६ एप्रिल, २०२३ रोजी संबंधित विभागाकडे तक्रार केली असता विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्थळपाहणी करुन अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालात उक्त इमारतीचे बांधकाम हे पूर्ण झालेले असून प्लास्टरींगचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारत दुरुस्ती करणेसंदर्भात तसेच संबंधित दोषी विकासक व अभियंता यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

जागृती सह.गृह.संस्थेच्या पुनर्वसन इमारत क्र.ब मधील भिंतींचे, किचन व टॉयलेटच्या प्लास्टरचे काम गुणवत्तेनुसार नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) निकृष्ट दर्जाचे प्लास्टर तोडून परत प्लास्टर करण्याबाबत विकासक यांना दि.२०.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये तसेच दि.१३.०६.२०२३ रोजीच्या स्थळपाहणी दरम्यान कळविण्यात आले आहे. तशी हमी विकासक/वास्तुविशारद यांनी स्थळपाहणी दरम्यान दिलेली आहे.

तदनंतर, गुणवत्तेनुसार न झालेल्या कामाबाबत संबंधित विकासक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्यासमवेत मुख्य कार्यकारी अधिकारी/झोपुप्रा यांच्या दालनात दि.३०.०६.२०२३ रोजी संयुक्त बैठक आयोजित करुन संबंधित विकासकास सदर बांधकाम दुरुस्त करुन देण्याबाबत पुनःश्च सूचना देण्यात आली आहे. सदर बैठकीदरम्यान विकासकाद्वारे निकृष्ट दर्जाचे प्लास्टर तोडण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली असल्याबाबत माहिती देण्यात आली. तसेच नवीन प्लास्टरचे काम गुणवत्तेनुसार करण्याबाबत विकासकाने हमी दिली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील दिंडोशी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी केलेल्या भूसंपादनाबाबत**

**(२२) * ६७१२९ श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दिंडोशी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी जमिनीचे भूसंपादन करताना तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.विश्वास पाटील यांनी नियमांचे व न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने देखील त्यांच्या निर्णयात श्री. विश्वास पाटील यांनी विकासक व सोसायटीच्या फायद्यासाठी बेकायदा आदेश काढला असा ठपका ठेवत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी सुरू असलेली भूसंपादन प्रक्रिया रद्द केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी दोषी असलेल्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, विश्वास पाटील यांचेविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१) व (२) मौजे दिंडोशी ता.बोरीवली येथील मिळकतीवरील शिवनेरी नवगृह निर्माण विटभट्टी एस.आर.ए. सह.गृह.संस्थेच्या भूसंपानाबाबतचा प्रस्ताव तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी शासनास दाखल करताना जमिनीच्या मूळ मालकास पुनर्विकास करण्याची संधी न देता तसेच या मिळकतीबाबत उपरोक्त सह. गृह.संस्था व ॲटलँटीक कन्स्ट्रक्शन कंपनी यांच्यातील चुकीचा समझोता करारनाम्याच्या आधारे सादर केला होता, असे निरीक्षण मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.२२८३/२०१७ मध्ये दिनांक १३.४.२०२३ रोजी पारित केलेल्या आदेशात नोंदविलेले आहेत. तसेच या प्रकरणातील भूसंपादनाचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालयाने रद्द केलेला आहे.
(३) व (४) तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण हे दि. ३०.६.२०१७ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. सदर घटना सेवानिवृत्तीनंतर ४ वर्षापेक्षा अधिक कालावधी झालेला असल्याने, त्यांच्याविरुध्द अखिल भारतीय सेवा (मृत्यू-नि-सेवानिवृत्ती लाभ) नियम, १९५८ च्या तरतूदीनुसार कारवाई करता येत नाही.

-----------------

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा उत्तीर्ण झालेल्या तरूणीची हत्या झाल्याबाबत**

**(२३) * ६९७०६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेली व परिक्षेत्र वनअधिकारी म्हणून निवड झालेल्या दर्शना दत्ता पवार या २६ वर्षीय तरूणीचा पुणे जिल्हयातील राजगड पायथा येथे सतीचा माळ या ठिकाणी सडलेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने तिची हत्या झाल्याचे दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) सदर गुन्हयातील आरोपीविरूध्द वेल्हे पो.स्टे. येथे गु.र.नं. ६१ /२०२३, भा.द.वि. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस दिनांक २२/०६/२०२३ रोजी अटक करण्यात आली असून गुन्हयाचा तपास सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानखुर्द (मुंबई) येथील अल्पवयीन मुलीवर झालेला सामूहिक अत्याचार

**(२४) * ६५६४९ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द (मुंबई) येथील १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी आपल्या नातेवाईकांच्या घरी जाण्यास निघालेली असताना अनोळखी इसमांनी जबरदस्तीने तीला चालत्या वाहनात नेऊन तीन जणांनी सामूहिक बलात्कार केल्याची घटना दिनांक २९ जुलै, २०२० रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पीडीत मुलीच्या नातेवाईकांनी मानखुर्द पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बलात्कारानंतर गुन्ह्यातील गाडी पोलिसांनी जप्त केली मात्र मानखुर्द पोलीस अधिकाऱ्यांनी मुलीची न्यायवैद्यक चाचणी केली नसल्याने आरोपींच्या विरोधात कोणतेही ठोस पुरावे मिळाले नसल्यामुळे तिन्ही आरोपींच्या विरोधात पोलिसांनी बलात्काराचा गुन्हा दाखल केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पीडीत मुलीला न्याय तसेच दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शिवाजीनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.००/२३ अन्वये भादवि कलम ३७६, ३७६(३), ३७६(डअ), ३५४, ३५४(अ), ३६३, ५०६ सह पोक्सो कायदा कलम ६,१०,१२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.परंतु गुन्ह्याचे मुख्य घटनास्थळ मानखुर्द पोलीस स्टेशन येथे असल्याने सदर गुन्हा मानखुर्द पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ३२५/२०२० अन्वये भादवि कलम ३७६, ३७६(३), ३७६(डअ), ३५४, ३५४(अ), ३६३, ५०६ सह पोक्सो कायदा कलम ६,१०,१२ अंतर्गत दाखल करून तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(३) सदर प्रकरणी मुलीची न्यायवैद्यक चाचणी करून आरोपींविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) सदर गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करून त्यांच्याविरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आसरे (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील वाकी नदीच्या पात्रात अनधिकृतपणे संरक्षक भिंत उभारण्यात आल्याबाबत

**(२५) * ६५१६१ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसरे (ता.खालापूर, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील वाकी नदीच्या पात्रात कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे संरक्षक भिंत उभारण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भिंतीमुळे पावसाळयात पुराचे पाणी शेतात शिरून आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या भाजीपाला व भातपिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदर अनधिकृत बांधकाम हटविण्यासंबंधी जलसंपदा विभागाकडून दिलेल्या नोटीसांनुसार संबंधितांकडून सदर भिंत हटविण्यात आली आहे. सबब, सदर संरक्षक भिंतीमुळे पावसाळ्यात पुराचे पाणी शेतात घुसून आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांच्या भाजीपाला व भातपिकांचे नुकसान होणेचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) सदर भिंतीचे काम माहे डिसेंबर, २०२२ रोजी जलसंपदा विभागाची परवानगी न घेता अनधिकृतपणे केल्याचे उपविभागीय कार्यालयाच्या निदर्शनास आले. तदनंतर उपविभागीय कार्यालयाकडून दिनांक २९.१२.२०२२ रोजी प्रथम नोटिस देण्यात आली. त्यानंतर परत दोन नोटीसा देण्यात आल्या तरी देखील संबंधितांनी काम थांबविले नाही. तदनंतर संबंधिताकडून दिनांक १९.०६.२०२३ रोजी सदर बांधकाम हटविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक, ठाणे, अकोला, अमरावती व नागपूर जिल्हयातील अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळेतील शिक्षकांना वेतनातील थकबाकी मिळण्याबाबत

**(२६) * ६६६६२ श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: नाशिक, ठाणे, अकोला, अमरावती व नागपूर जिल्हयातील आदिवासी विभागांतर्गत अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळांमधील सुमारे १,२२२ प्राथमिक शिक्षकांना मागील वेतनातील थकबाकी अद्याप मिळाली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्राथमिक शिक्षक कर्मचाऱ्यांना माहे डिसेंबर, २००५ व दिनांक १ ऑक्टोबर, २००६ च्या शासन निर्णयान्वये निवृत्तीच्या दिनांकापासून 'विशेष बाब' म्हणून मान्यता देण्यात आलेल्या सदर शिक्षकांना मागील वेतनातील थकबाकी अदा करणेबाबत आदिवासी विभाग आयुक्तालयांकडून शासनाला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दिनांक १२ जानेवारी, २०२१ व दिनांक २ फेब्रुवारी, २०२१ रोजीपर्यंत १,२२२ पैकी कार्यरत असलेल्या १,०५१ शिक्षक कर्मचाऱ्यांची सुमारे रु.२६,०६,०१,८८३/- एवढी थकबाकीची रक्कम नियुक्तीच्या दिनांकापासून अदा करणेबाबत उच्चस्तरावरून आदेश होण्याची मागणी सातत्याने केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी `समर्थन' संस्थेकडून आदिवासी विकास मंत्री, प्रधान सचिव तसेच आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली असल्याचे दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेतन थकबाकी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत :** (१), (२), (३), (४) व (५) होय.

आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक ०६.१२.२००५ अन्वये ५९९ व दिनांक २५.०९.२००६ शासन निर्णयान्वये ३५७ व २६६ अशा एकूण १२२२ अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षकांना नियुक्तीच्या दिनांकापासून विशेष बाब म्हणुन मान्यता प्रदान करण्यात आली आहे. मान्यता प्रदान करण्यात आलेल्या १,२२२ शिक्षकांना थकबाकी अदा करण्याकरीता आयुक्त, आदिवासी विकास यांनी दिनांक ०२.०२.२०२१ रोजी १०५१ कार्यरत कर्मचाऱ्यांना नियुक्तीच्या दिनांकापासून थकबाकी रु.२६,०६,०१,८८८३/-इतकी अदा करण्याबाबत प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. याप्रकरणी थकबाकी अदा करण्यासंदर्भात विहित विवरणपत्रात माहिती सादर करण्याबाबत निर्देश शासनाने दिलेले असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) तालुक्यात सुरू असलेल्या मुंबई ऊर्जा प्रकल्पांतर्गतच्या विद्युत वाहिन्यांबाबत**

**(२७) * ६५२७० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील रोहिंजण, धानसर, कानपोली गावांमध्ये सुरू असलेल्या मुंबई ऊर्जा प्रकल्पांतर्गत टाकण्यात येत असलेल्या विद्युत वाहिनीच्या कामांमुळे प्रकल्पबाधितांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्युत वाहिन्यांच्या कामासाठी उभारण्यात येणाऱ्या टॉवर व लाईनमुळे विदयुत वाहिनीखाली येणारी जमिनी तसेच विद्युत वाहिनीच्या प्रभाव क्षेत्रातील सुमारे ३० मीटर अंतरावरील जमीन अविकसित ठेवावी लागणार असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापही या प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रकमेची निश्चिती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शेतकऱ्यांना योग्य नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) पारेषण वाहिनीच्या प्रकल्पात इतर विकास प्रकल्पांप्रमाणे भूसंपादन होत नाही आणि जमिनीची मालकी मुळ जमिन मालकाकडेच राहते. त्याचप्रमाणे मुंबई ऊर्जा मार्ग या पारेषण प्रकल्पासाठीही जमिनीचे संपादन होत नसून जमिनीच्या वापरासाठी (राईट ऑफ वे) बाधित जमिन मालकांना नुकसान भरपाई देण्यात येते.

(३) ऊर्जा विभाग शासन निर्णय दिनांक २.११.२०२२ अन्वये ६६ के.व्ही. त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या मनोऱ्याने व्याप्त जागेचा तसेच अति उच्च दाब पारेषण वाहिन्याच्या पट्टयाखालील जमिनीचा नुकसान भरपाईपोटी मोबदला देण्यासंदर्भात सुधारित धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार रायगड जिल्हयातील उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उपविभागीय स्तरीय मूल्यांकन समितीची स्थापना होऊन दिनांक २४.०१.२०२३ रोजी सुधारित दर घोषित केले आहेत.

(४) ऊर्जा विभाग, शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ मधील (ऊ) मध्ये "अपवादात्मक / असाधारण परिस्थितीबाबत उप विभागीय स्तरीय मूल्यांकन समितीने अपवादात्मक / असाधारण परिस्थिती, प्रकल्पांचे महत्व व प्रकल्पास होणारा विलंब विचारात घेऊन जमिनीच्या मुल्यांकनाबाबत जमिनीच्या नुकसान भरपाईपोटी मोबदल्याबाबत उचित निर्णय घेऊन मोबदल्याचे आदेश पारित करावेत" अशी तरतूद आहे.

त्यानुसार अपवादात्मक / असाधारण परिस्थिती मोबदला देण्याबाबत तातडीने उचित निर्णय घ्यावा असे निर्देश जिल्हाधिकारी, रायगड यांना शासन पत्र दिनांक १४.०७.२०२३ अन्वये दिले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.